## राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, कोंकण खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (३) अन्वये झालेले व्दितीय अपिल

## अपिल क्रमांक : के.आर-११६६-अ/२०२२

**अपिलार्थी, श्री.भगवान यादव कुमावत**
**२०५, वास्तुगणेश अपार्टमेंट**
**दत्ताचौक, बेलीवली बदलापूर (प), जि.ठाणे ४२१ ५०३**

विरुध्द

जन माहिती अधिकारी, लेखा विभाग
उल्हासनगर महानगरपालिका,
मुख्य प्रशासकीय इमारत, चोपडा कोर्ट रोड,
उल्हासनगर, जि.ठाणे ४२१ १०३

प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा मुख्य लेखा अधिकारी
उल्हासनगर महानगरपालिका,
मुख्य प्रशासकीय इमारत, चोपडा कोर्ट रोड,
उल्हासनगर, जि.ठाणे ४२१ १०३

**द्वितीय अपिल अर्ज सुनावणीचा दिनांक : १३.८.२०२४**

| माहितीचा अर्ज दाखल केल्याचा दिनांक | जन माहिती अधिकारी यांच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपिल अर्ज दाखल दिनांक | प्रथम अपिल आदेश दिनांक |
|---|---|---|---|
| १२.१०.२०२१ | ---- | ५.१.२०२२ | ------ |

अपिलार्थी यांनी दि.१८.४.२०२२ रोजीच्या अर्जान्वये "माहिती न दिल्याबाबत." असे कारण नमूद करुन कलम १९(३) अन्वये व्दितीय अपिल अर्ज दाखल केला आहे. सदर द्वितीय अपिल अर्जात त्यांनी कोणतीही विनंती केलेली नाही.

सदर द्वितीय अपिलावर आज दिनांक १३.८.२०२४ रोजी सुनावणी घेण्यात आली.

सदर सुनावणीस अपिलार्थी अनुपस्थित आहेत. (कार्यालयाद्वारे नोटीस प्राप्त झालेबाबतचे ट्रॅकिंग रिपोर्ट सादर करण्यात आले असून, ते नस्तीसोबत अभिलेखावर ठेवण्यात आलेले आहेत) तथापि विद्यमान जन माहिती अधिकारी श्री. विजय खेडकर उपमुख्य लेखा अधिकारी उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर हे उपस्थित आहेत

अपिलार्थी यांनी मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितली आहे.

*"(मला शासन निर्णय परिपत्रक उमपाचे धोरणात्मक निर्णय व खालील मुद्याबाबतच्या माहितीच्या प्रती उपलब्ध कराव्यात)"*

*" (१) उ.मा.प.तील सेवानिवृत्त कर्मचारी यांना सेवानिवृत्ती विषयी सर्व बाबी किती व कोणत्या कालावधीत द्यावयाच्या आहेत. (२) निवृत्ती धारक यांनी सेवानिवृत्ती विषयक सर्व तक्रारी व त्यावर केलेल्या कार्यवाहीची माहिती द्यावी. (३) निवृत्ती वेतन अंशीकरण विक्री बाबतची सर्व माहिती देणे."*

तद्नंतर अपिलार्थी यांनी जोडपत्र ब मध्ये "माहिती प्राप्त झालेली नाही" असे कारण नमूद करुन प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे कलम १९(१) अन्वये प्रथम अपिल दाखल केले.

अपिलार्थी अनुपस्थित असल्यामुळे द्वितीय अपिलावर, गुणवत्तेवर निर्णय देण्यात येत आहे.

या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी असे निवेदन केले की, अपिलार्थी यांना अद्यापपर्यंत माहिती पुरविण्यात आलेली नाही. अपिलार्थी यांनी दिनांक१२.१०.२०२१ रोजी माहिती मागण्यासंबंधीचा अर्ज केला होता. त्यानंतर त्यांनी दि.५.१.२०२२ रोजी प्रथम अपील दाखल केले. तथापि, त्यांना अद्यापपर्यंत माहिती देण्यात आलेली नाही. त्यामुळे अपिलार्थींना माहिती पुरविण्यास झालेल्या विलंबाबद्दल विलंबाच्या प्रत्येक दिवसापोटी त्यावेळी कार्यरत असणारे तत्कालीन जन माहिती अधिकारी त्यांचेवर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत २० (१) अन्वये प्रति दिवस रुपये २५०/- अधिकतम (रुपये २५,०००/-) इतक्या शास्तीची आकारणी का करण्यात येऊ नये याचा लेखी खुलासा त्यांनी आयोगाकडे स्वतः उपस्थित राहून सादर करणे उचित होईल.

त्याचप्रमाणे अपिलार्थीच्या प्रथम अपीलावर तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन आदेश पारित केले नाहीत. त्यामुळे त्यांचेविरुद्धदेखील विभागीय चौकशी का करण्यात येऊ नये, याचा लेखी खुलासा त्यांनीदेखील आयोगाकडे स्वतः उपस्थित राहून सादर करणे उचित होईल. सबब, विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांनी मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना पुढील १५ दिवसात विनामूल्य उपलब्ध करून देणे उचित होईल. प्रस्तुत प्रकरणी पुनश्च सुनावणी घेण्यात येईल. यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

**आदेश**

१. विद्यमान जन माहिती अधिकारी तथा उपमुख्य लेखा अधिकारी, लेखा विभाग, उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर यांनी **अपिलार्थी यांनी मागणी केलेली संपूर्ण माहिती पुढील १५ दिवसात समक्ष/ नोंदणीकृत टपालाने नि:शुल्क पुरवावी.** जी माहिती उपलब्ध नाही त्याबाबत मुद्देनिहाय स्पष्ट व विविक्षित उत्तर अपिलकर्ता यांना १५ दिवसांत पाठवावे.

२. तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. सुर्यकांत खटके, उपमुख्य लेखा अधिकारी, लेखा विभाग, उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर यांनी अपिलार्थी यांच्या दिनांक १२.१०.२०२१ रोजीच्या माहिती अर्जाला अनुसरुन विहीत मुदतीत अथवा त्यानंतर देखील माहिती पुरविली नाही. म्हणून त्यांचेवर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत २० (१) अन्वये प्रति दिवस रु.२५०/- (अधिकतम रु.२५,०००/-) इतक्या शास्तीची आकारणी का करण्यात येऊ नये, **याचा लेखी खुलासा त्यांनी आयोगाकडे दि. १६.१०.२०२४ रोजी सकाळी ११.०० वाजता स्वत: उपस्थित राहून सादर करावा. अन्यथा, प्रस्तुत प्रकरणी त्यांचे काहीही म्हणणे नाही असे गृहीत धरुन शास्तीचे आदेश कायम केले जाऊ शकतील, याची नोंद घ्यावी.**

३. तत्कालीन प्रथम अपीलीय प्राधिकारी श्री.विकास चव्हाण, मुख्य लेखा अधिकारी, उल्हासनगर महानगरपालिका यांनी अपीलार्थी यांनी दिनांक ५.१.२०२२ अन्वये दाखल केलेल्या प्रथम अपीलावर सुनावणी घेऊन निर्णय निर्गमित केलेला दिसून येत नाही. त्यामुळे त्यांचेविरुध्द सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे शासन परिपत्रक क्र.के.मा अर्ज-२००७/७४/प्र.क्र.१५४/०७/०६, दि.३१/०३/२००८ नुसार शिस्तभंगाविषयक कार्यवाही प्रस्तावित का करण्यात येऊ नये, याबाबतचा **लेखी खुलासा त्यांनी आयोगाकडे दि. १६.१०.२०२४ रोजी सकाळी ११.०० वाजता स्वत: उपस्थित राहून सादर करावा. सदर मुदतीत लेखी खुलासा प्राप्त न झाल्यास त्यांचे प्रस्तुत प्रकरणी काहीही म्हणणे नाही, असे गृहित धरुन शिस्तभंगाविषयक कार्यवाही प्रस्तावित करण्याबाबतचे आदेश कायम करण्यात येतील, याची नोंद घ्यावी.**

४. **प्रस्तुत प्रकरणी पुढील सुनावणी दि.१६.१०.२०२४ रोजी सकाळी ११.०० वाजता घेण्यात येईल.**

सही/-
**(शेखर चन्रे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : १३ ऑगस्ट, २०२४

**प्रत आवश्यक कार्यवाहीस्तव रवाना,**

तत्कालीन प्रथम अपीलीय प्राधिकारी श्री. विकास चव्हाण, मुख्य लेखा अधिकारी
उल्हासनगर महानगरपालिका,
मुख्य प्रशासकीय इमारत, चोपडा कोर्ट रोड, उल्हासनगर, जि.ठाणे ४२१ ००३.
**-यांना प्रत** विद्यमान प्रथम अपीलीय प्राधिकारी श्री. किरण भिलारे, मुख्य लेखा अधिकारी
उल्हासनगर महानगरपालिका,
मुख्य प्रशासकीय इमारत, चोपडा कोर्ट रोड, उल्हासनगर, जि.ठाणे ४२१ ००३ **यांचेमार्फत रवाना.**

तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. सुर्यकांत खटके, उपमुख्य लेखा अधिकारी,
लेखा विभाग, उल्हासनगर महानगरपालिका,
मुख्य प्रशासकीय इमारत, चोपडा कोर्ट रोड, उल्हासनगर, जि.ठाणे ४२१ ००३
**-यांना प्रत** विद्यमान जन माहिती अधिकारी श्री. विजय खेडकर, उपमुख्य लेखा अधिकारी,
लेखा विभाग, उल्हासनगर महानगरपालिका, मुख्य प्रशासकीय इमारत,
चोपडा कोर्ट रोड, उल्हासनगर, जि.ठाणे ४२१ ००३ **यांचेमार्फत रवाना.**

## सुनावणी दिनांक १६.१०.२०२४ ( In Continuation of order dt.१३.०८.२०२४)

## विवेचन

उपरोक्त दि.१३.०८.२०२४ रोजीच्या आदेशान्वये विद्यमान जन माहिती अधिकारी यांना माहिती पुरविणेबाबत व तत्कालीन जन माहिती अधिकारी यांना माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम २० (१) अन्वये शास्ती का लादण्यात येऊ नये याबाबतचे स्पष्टीकरण तसेच तत्कालीन प्रथम अपिलीय प्राधिकारी यांना सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे शासन परिपत्रक क्र.के.मा अर्ज-२००७/७४/प्र.क्र.१५४/०७/०६, दि.३१/०३/२००८ नुसार शिस्तभंगाविषयक कार्यवाही प्रस्तावित का करण्यात येऊ नये, याबाबतचा लेखी खुलासा आयोगाकडे सादर करणेबाबत आदेशित केले होते. त्याअनुषंगाने सदर द्वितीय अपिलावर आज दिनांक १६.१०.२०२४ रोजी सुनावणी घेण्यात आली.

सदर सुनावणीस अपिलार्थी तसेच तत्कालीन व विद्यमान जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत (कार्यालयाद्वारे नोटीस पाठविलेबाबतचे ट्रॅकिंग रिपोर्ट सादर करण्यात आले असून, ते नस्तीसोबत अभिलेखावर ठेवण्यात आलेले आहेत). तत्कालीन प्रथम अपिलीय प्राधिकारी श्री.विकास वैजीनाथ चव्हाण, मुख्य लेखा अधिकारी, उल्हासनगर महानगरपालिका उपस्थित आहेत.

सदर प्रकरणी आजच्या सुनावणीस उपस्थित अधिकारी यांनी असे निवेदन केले की, अपिलार्थी यांना दि.२३.०८.२०२४ रोजीच्या पत्रान्वये माहिती पुरविण्यात आलेली आहे.

आयोगाने दि.१३.०८.२०२४ रोजीच्या आदेशान्वये तत्कालीन जन माहिती अधिकारी यांना माहिती पुरविण्यास झालेल्या विलंबाबाबतचा खुलासा सादर करणेबाबत आदेशित केले होते. तथापि तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री.सुर्यकांत खटके, उप मुख्य लेखाधिकारी, लेखा विभाग, उल्हासनगर महानगरपालिका यांनी त्यांचा कोणताही खुलासा सादर केलेला नाही. तसेच ते आजच्या सुनावणीसही अनुपस्थित आहेत. त्यांना त्यांचा खुलासा सादर करण्यासाठी एक संधी देण्यात येत आहे. त्यांनी पुढील सुनावणीच्यावेळी स्वत: उपस्थित राहून आयोगाने दि.१३.०८.२०२४ रोजी आदेशित केल्याप्रमाणे त्यांचा खुलासा सादर करणे योग्य होईल.

तत्कालीन प्रथम अपिलीय प्राधिकारी श्री.विकास वैजीनाथ चव्हाण, मुख्य लेखा अधिकारी, उल्हासनगर महानगरपालिका यांनी दि.१५.१०.२०२४ रोजीच्या पत्रान्वये त्यांचा लेखी खुलासा सादर केला आहे. सदर खुलाश्यात त्यांनी नमूद केले की, त्यांनी अपिलार्थी यांनी दाखल केलेल्या प्रथम अपिलावर दि.१८.०१.२०२२ रोजी सुनावणी घेऊन, अपिलार्थी यांना दि.२१.०१.२०२२ पर्यंत माहिती पुरविणेबाबत आदेश पारित केले होते. तरी त्यांचा खुलासा मान्य करण्यात यावा, अशी त्यांनी आयोगाकडे विनंती केली आहे.

वरील वस्तुस्थिती विचारात घेवून खालीलप्रमाणे निर्णय देण्यात येत आहे.

**आदेश**

१. तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री.सुर्यकांत खटके, उप मुख्य लेखाधिकारी, लेखा विभाग, उल्हासनगर महानगरपालिका यांनी आयोगाने दि.१३.०८.२०२४ रोजी आदेशित केल्याप्रमाणे त्यांचा लेखी कोणताही खुलासा सादर केलेला नाही. त्यामुळे त्यांना पुन्हा एकदा संधी देण्यात येत आहे. पुढील सुनावणीच्यावेळी तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री.सुर्यकांत खटके, उप मुख्य लेखाधिकारी, लेखा विभाग, उल्हासनगर महानगरपालिका यांनी आयोगाच्या दि.१३.०८.२०२४ रोजीच्या आदेशाप्रमाणे माहिती पुरविण्यास झालेल्या विलंबाबतचा लेखी खुलासा स्वत: उपस्थित राहून सादर करावा. अन्यथा, त्यांचे काहीही म्हणणे नाही असे गृहीत धरुन शास्तीचे आदेश कायम केले जाऊ शकतील, याची नोंद घ्यावी.
२. तत्कालीन प्रथम अपिलीय प्राधिकारी श्री.विकास वैजीनाथ चव्हाण, मुख्य लेखा अधिकारी, उल्हासनगर महानगरपालिका यांनी सादर केलेला खुलासा समाधानकारक असून, त्यांचा दि.१५.१०.२०२४ रोजीचा खुलासा मान्य करण्यात येत आहे. त्यांचेवरील प्रस्तावित शिस्तभंगाची कार्यवाही रद्द करण्यात येत आहे.
३. प्रस्तुत प्रकरणी पुढील सुनावणी दि.०२.१२.२०२४ रोजी दुपारी १२.०० वाजता घेण्यात येईल.

(शेखर चन्ने)
राज्य माहिती आयुक्त,
कोंकण खंडपीठ

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : १६ ऑक्टोबर, २०२४ .

**प्रत आवश्यक कार्यवाहीस्तव रवाना,**
तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. सुर्यकांत खटके, उपमुख्य लेखा अधिकारी, लेखा विभाग, उल्हासनगर महानगरपालिका, मुख्य प्रशासकीय इमारत, चोपडा कोर्ट रोड, उल्हासनगर, जि.ठाणे ४२१ १०३.

**-यांना प्रत**
विद्यमान जन माहिती अधिकारी श्री. विजय खेडकर,
उपमुख्य लेखा अधिकारी, लेखा विभाग, उल्हासनगर महानगरपालिका,
मुख्य प्रशासकीय इमारत, चोपडा कोर्ट रोड, उल्हासनगर,
जि.ठाणे ४२१ १०३ **यांचेमार्फत रवाना.**